हवामान आधारीत कृषि सल्ला

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल: rahuri.amfu@gmail.com

९३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०१/२०२०

जिल्हा : अहमदनगर

मागील आठवड्यातील हवामान (१०/०१/२०२० ते १६/०१/२०२०)							हवामान घटक	पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१८/०१/२०२० ते २२/०१/२०२०)				
१०	११	१२	१३	१४	१५	१६	दिनांक	१८	१९	२०	२१	२२
०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	०.०	पाऊस (मिमी)	०	०	०	०	०
२२.६	२०.०	२७.२	२६.०	२७.२	२६.४	२८.६	कमाल तापमान (अं.से.)	३२	३२	३२	३०	३१
११.२	११.४	१३.४	१३.९	१४.४	१३.९	१२.९	किमान तापमान (अं.से.)	१३	१४	१४	१३	१३
स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ	अंशतः ढगाळ
७६	८८	८१	८३	८१	८५	८५	सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	४६	४२	५०	५२	४५
५२	४५	५१	४१	५१	४३	३१	दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	२५	२७	३१	३१	२९
१.६	०.६	०.६	०.७	१.३	१.२	१.५	वाऱ्याचा वेग (किमी/तास)	९	१०	७	६	७

हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

पीक	अवस्था	कृषि विषयक सल्ला
हवामान सारांश/ इशारा		दिनांक २०, २१ व २२ जानेवारी २०२० रोजी आकाश ढगाळ राहील.
सामान्य सल्ला		शेतकऱ्यानी पिकावर कीटकनाशकाची , बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतःची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.
संदेश		करडई पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच व्यवस्थापनासाठी डायमेथोएट ३० % प्रवाही १० मिली/ १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
सुरू ऊस	लागवडीची पूर्वतयारी	1) सुरू ऊस लागवडीसाठी रान तयार करून ठेवावे. सुरू ऊसाच्या लागवडीकरीता को-८६०३२(निरा),को-९४०१२(सावित्री), को.एम.-०२६५ (फुले-२६५) या जातींचे बेणे निवडावे. 2) लागवडीपुर्वी प्रति हेक्टरी बेण्यासाठी १०० ग्रॅम बावीस्टीन + ३०० मि.ली. मेलॅथिऑन + १०० लिटर पाणी या द्रावणात १० मिनिटांसाठी बेणे प्रक्रिया केल्यानंतर १० किलो ॲसिटोबॅक्टर जीवाणू + १०० लिटर पाणी या द्रावणात वरील बेणे ३० मिनिटे बुडून लागवड करावी. 3) लागवडीच्यावेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र (५४ किलो युरिया) + ६० किलो स्फुरद (३७५ किलो सिं.सुपर फॉस्फेट) + ६० किलो पालाश (१०० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे.
हरभरा	जिरायती - घाटे भरण्याची अवस्था बागायती - वाढीची अवस्था	1) सध्याच्या ढगाळ हवामानामुळे हरभर्यावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी २ ग्रॅम इमामेक्टीन बेन्झोएट ५ एस.जी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. 2) जिरायती हरभरा परिपक्व झाला असल्यास काढणी करुन घ्यावी. काही वाणामध्ये काढणीस उशीर झाल्यास घाटे गळ होऊ शकते. 3) घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी कामगंध सापळे हेक्टरी ५ या प्रमाणात लावावे. 4) घाटेअळीचा प्रादुर्भाव दिसताच निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अझाडिरेक्टीन (३०० पी पी एम) ५० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. 5) ज्या ठिकाणी जिरायती हरभऱ्यात मोठ्या अवस्थेतील घाटे अळी आढळून येत असेल तर क्लोरान्ट्रानीलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे (एकरी २०० लिटर पाणी). 6) ढगाळ हवामानामुळे ज्या भागामध्ये माव्याचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसत असेल त्या ठिकाणी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा ५ टक्के अझाडिरेक्टीन (३०० पी पी एम) ५० मिली १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

हवामान आधारीत कृषि सल्ला

ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

तुर	शेंगा पक्वतेच्या अवस्था	1) शेंग माशी, घाटे अळी आणि पिसारा पतंग या किडींच्या नियंत्रणासाठी खालील फवारणी करावी : 2) इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के दाणेदार ४ ग्रॅम किंवा फ्लुबेंडामाईड २० टक्के दाणेदार ५ ग्रॅम किंवा क्लोरान्ट्रानीलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही ३ मिली प्रति १० लीटर पाण्यातून फवारावे (एकरी २०० लिटर पाणी). 3) लवकर परिपक्व होणाऱ्या वाणाची काढणी करून घ्यावी.
करडई		मावा या किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
गहू		मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्ल्यू.जी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
भुईमुग	पेरणीपुर्व तयारी	उन्हाळी भुईमुगाची पेरणी १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी. पेरणीसाठी फुले उन्नती, टी.ए.जी.२४, टी.जी.२६, टी.पी.जी.४१, जे.एल.५०१ या वाणांपैकी निवड करावी. पेरणीचे अंतर ३० ×१० सें.मी. ठेवावे. त्यासाठी हेक्टरी १०० ते १२० किलो बियाणे वापरावे.
रब्बी ज्वारी		लष्करी अळीच्या नियंत्रणासाठी १.५% क्विनॉलफॉस भुकटी किंवा ५% मेलॅथि ऑन भुकटी २० किलो प्रति एकरी या प्रमाणात सकाळी वारा शांत असतांना धुरळावी.
कांदा	वाढ	कांद्यावरील फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३०% ईसी १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. ६ मि.ली. या कीटकनाशकांच्या आलटुन पालटुन फवारण्या कराव्यात. कांद्यावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५ (०.३%) २५ ग्रम किंवा टेब्यॅकोनॅझोल (०.१%) १० मिली हे बुरशीनाशक १० लि टर पाण्यातुन आलटून-पालटून फवारावेत.
डाळिंब		मावा किडीच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : १७/०१/२०२०

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा
प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.